दैनिक

# महावृत्त

R.No.MAHMAR/25/A3029

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ९२ गुरूवार दि.१६ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## स्टॅच्यू ऑफ नॉलेज पुतळ्याच्या कामासाठी १२ कोटी रूपये मंजूरीचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावा. व्ही एस पॅंथर्स युवा संघटनेची आ.अभिमन्यू पवार यांच्या कडे मागणी

लातूर :- लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे प्रस्तावीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फूटाच्या भव्य पुतळा उभारणीच्या कामासाठी असलेली प्रशासकीय मान्यता तातडीने प्रदान करावी तसेच या कामासाठी लागणारा अतिरिक्त १२ कोटी रूपयांचा निधी मागणीचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावा अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांच्याकडे व्हीएस पॅंथर्स युवा संघटनेच्या वतीने युवानेते विनोद खटके यांनी केली आहे. या निवेदनात पूढे म्हटले आहा की, विश्वरत्न, भारतरत्न, बोधिसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फूटाचा भव्य पुतळा स्टॅच्यू ऑफ नॉलेज उभा करण्यास यापूर्वीच



शासनाने १० कोटी रूपये मंजुरी दिलेली आहे. मात्र अनेक महिने होवून सूध्दा या बाबत प्रशासन स्तरावर कांहीच कार्यवाही होत नाही.लातूर मनपा आयुक्त यांनी या कामाच्या पहिल्या टप्प्यासाठी च्या कामाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्याप प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली नाही ही बाब अतिशय वेदनादायी आहे. तसेच या कामासाठी लागणाऱ्या उर्वरित निधी मागणीचा प्रस्ताव सूध्दा शासनाकडे सादर करण्यात आला नाही. सदरचा पुतळा तातडीने उभारला पाहिजे या साठी तमाम आंबेडकरी समुदायाची आग्रही मागणी आहे.परंतू या कामासाठी जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याची भावना निर्माण होत आहे. तरी तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान करावी तसेच पुतळा उभारणी कामासाठी लागणारा उर्वरित १२ कोटी रुपयांच्या निधी मागणीचा प्रस्ताव तातडीने शासनाला सादर करावा.अन्यथा याप्रकरणी नावीलाजाणे जनअंदोलन उभे करावे लागेल असे नमूद आहे.या शिष्टमंडळात डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, संपर्कप्रमुख आनंद जाधव ,मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे, जिल्हा अध्यक्ष शरद किणीकर, कामगार आ. जिल्हा अध्यक्ष ड किरण पायळ, संपर्क प्रमुख आनंद जाधव यांची उपस्थिती होती.

## ऐरोली नवी मुंबई येथील वंचित च्या निर्धार मेळाव्याला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

शेकडो कार्यकर्त्यांनी वंचित मध्ये युवा नेते : सुजात (दादा) आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंचित बहुजन आघाडी मध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला, त्यावेळी मार्गदर्शन करताना सुजाता आंबेडकर म्हणाले की तुम्हीच तुमच्या वार्डचे बाळासाहेब आहात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीला सामोरे जायचे आहे तर आप आपल्या वार्ड मधील लोकांची पहिले कामे कराल तेव्हांच मतदार राजा वंचितला मतदान करतील..!




नवी मुंबई / के. एच. हनवते :- ऐरोली, नवी मंबई वंचित बहुजन आघाडी व वंचित बहुजन महिला आघाडी आयोजित निर्धार मेळाव्याला वंचित बहुजन आघाडीचे युवानेते : सुजात (दादा) आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीसह महेश भारतीय सर, रेखाताई ठाकूर (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष), अनील आण्णा जाधव आणि ऍड. सर्वजीत बनसोडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली निर्धार मेळावा उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना सुजात आंबेडकर यांनी वरील उदगार काढले हा निर्धार मेळावा यशस्वी करण्यासाठी नवी मुंबई जिल्हा कमिटी, महिला जिल्हा कमिटी, वंचित चे आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, व भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दल या सर्वांच्या मेहनतीने निर्धार मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला, यावेळी अश्वजीत जगताप (नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, शिल्पाताई रणदिवे (महिला जिल्हाध्यक्षा), संतोष जाधव (कार्याध्यक्ष), गजानन भोईर (जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट जनरल कामगार युनियन), चेतन अहिरे (मुंबई प्रदेश अध्यक्ष), सतीश राजगुरू (चेंबूर ट्रॉम्बे विभाग), राजेंद्र बनसोडे, अजय शिंदे, दीपक बाणाईत, गौतम कांबळे, संजू जवांदे, सुरेखाताई वानखेडे, नमिताताई भालेराव, सीमाताई बनसोडे, मायाताई मनवर, स्मिताताई लोखंडे, मनकरणाताई लाटे, पल्लवीताई शिंदे, सीमाताई कांबळे, अरुणा गजभिये, सतीश खंडाळे, संदेश हत्तर्गे, संदीप वाघमारे, निखिल आव्हाड, रामदास कांबळे, कपिल कांबळे, अनिल शिंदे (गुरुजी), संजय झनके (गुरुजी), विक्रांत चिकणे, अंकुश गायकवाड, अशोक शेगावकर, कपिल शेगावकर, किशोर औसरमल, सिद्दार्थ सिरसाळे (गुरुजी), राजेश भालेराव, ऐड. उमेश हातेकर, कल्याणराव हनवते, गौतम चव्हाण, सुभाष बलखंडे, हेमंत दिवेकर, राजु गायकवाड, राहुल शिरसाठ, अशोक शिरसाट, मल्लिनाथ सोनकांबळे, संभाजी वाघमारे, प्रदीप भुते, प्रतीक शिंदे, पत्रकार : रवि ढवळे, विशाल टोणगे, रंजीत तायडे, सतीश भोसले, मनोज पवार, गजानंद जाधव, आकाश भारदे, मुकेश इंगळे, वैभव वाघमारे, विनीत यादव, विशाल कदम, पारस कासारे, रुपेश तोगरे, राजाराम गाडे, दीपक गायकवाड, पुंडलिक दसाडे इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते सह हजारोंच्या संख्येत लोकं उपस्थित होते.

## एक हात मदतीचा! एक हात माणुसकीचा!



केज/प्रतिनिधी एक हात मदतीचा एक हात माणुसकीचा या संकल्पनेतून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने स्व.अशोक सौदागर यांच्या कुटुंबियांना ५ हजार रुपयाची मदत करण्यात आले आहे. अशीच मदत सौदागर कुटुंबियांना करण्यात यावी असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. केज तालुका शेतकरी कामगार पक्ष, क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठान च्या वतीने मयत स्व. अशोक सौदागर यांच्या कुटुंबाला ५ हजार रुपयाची आर्थिक मदत शेकाप महिला आघाडीच्या राणी क्षीरसागर,शिवश्री जनार्दन सोनवणे यांच्या हास्ते देण्यात आली. यावेळी भाई मोहन गुंड, भाई अशोक रोडे, तात्या राडे, शाम चिंचोलकर बबलु रोडे शुभम निगुळे इतर उपस्थित होते. घरातला कर्ता पुरुषाच निधन झाले आशा कुटुंबाला आधार म्हणून आर्थिक मदत करण्याचे आवाहन क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठाने केल आहे.

## पंकज धीर यांनी ६८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास. कुटुंबियांसाठी मागे ठेवलीये गडगंज संपत्ती

'महाभारत' मालिकेत कर्णची भूमिका साकारत चाहत्यांचं मनोरंजन करणाऱ्या अभिनेते पंकज धीर यांचं निधन झालं आहे. १४ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री त्यांचं निधन झालं आहे.

पंकज धीर यांनी वयाच्या ६८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला आहे. ते बऱ्याच काळापासून कॅन्सरशी झुंजत होते आणि त्यांना रुग्णालयात दाखल देखील करण्यात आलं होतं. पण कॅन्सरशी त्यांची झुंज अपयशी ठरली. अभिनेत्याच्या निधनाने टेलिव्हिजन आणि सिने विश्वात शोककळा पसरली आहे. तर पंकज धीर यांच्या निधनानंतर कुटुंबावर देखील दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनेत्याला श्रद्धांजली वाहिली आहे.

पंकज यांच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, १९८८ मध्ये बीआर चोप्रांच्या 'महाभारत' मध्ये कर्णाची भूमिका साकारताना पंकज धीर यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळालं. आजही त्यांची कर्णाची भूमिका प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय आहे. त्यानंतर पंकज धीर यांनी चंद्रकांता, युग, ग्रेट मराठा यांसारख्या मालिकेत आणि काही सिनेमांमध्ये देखील काम केलं.



झगमगत्या विश्वात काम करत असताना, त्यांनी इंडस्ट्रीमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. एका रिपोर्टनुसार, पंकज धीर एका एपिसोडसाठी जवळपास ६० हजार रुपये मानधन घ्यायचे. पंकज धीर यांनी साधक, बादशाह, सोल्जर्स यांसारख्या अनेक सिनेमांमध्ये छोट्या पण दमदार भूमिका साकारल्या. पंकज धीर यांची एकून संपत्ती मीडिया रिपोर्ट्सनुसार, पंकज धीर मृत्यूनंतर कुटुंबियांसाठी तब्बल ४२ कोटी रुपयांची संपत्ती मागे ठेऊन गेले आहेत. ज्यामध्ये त्यांची मुंबई आणि पंजाबमधील मालमत्ता, त्यांचं बँक बॅलन्स, गुंतवणूक आणि व्यवसायातील उत्पन्न यांचा समावेश होता. त्यांनी सिनेमे, टीव्ही शो तसेच ब्रँड एंडोर्समेंटमधून पैसे कमवले. त्यांचं वार्षिक उत्पन्न १.४४ कोटींपेक्षा जास्त होतं.. असं देखील सांगण्यात येत आहे

२००६ मध्ये पंकज धीर यांनी त्यांच्या भावासोबत मुंबईतील जोगेश्वरी भागात विजय स्टुडिओज हा रेकॉर्डिंग आणि प्रोडक्शन स्टुडिओ सुरू केला. पंकज धीर यांनी अनेक नव्या कलाकारांना देखील संधी दिल्या. आणि प्रोडक्शन स्टुडिओच्या माध्यमातून देखील त्यांनी चांगली कमाई केली.

## अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आ. निलंगेकर यांची मागणी

लातूर/प्रतिनिधी : लातूर जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालीहोती. त्या अतिवृष्टीने शेतीपिकांसह शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदत जाहीर केली आहे. सदर मदत मिळण्यास सुरुवात झाली असली तरी सर्वच शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी या मदतीची रक्कम मिळावी आणि रब्बीच्या पेरणीसाठी जी मदत होणार आहे. ती मदत पेरणीच्या पंधरादिवस अगोदर व्हावी अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. मराठवाड्यासह लातूर जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीने शेतकजयांच्या हातातून खरीप हंगाम गेलेला असून काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनी



खरडून गेलेल्या आहेत. त्याच बरोबर नागरिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. या पंचनाम्याच्या अहवालावरून राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती लक्षात घेवून आजपर्यंतचे सर्वात मोठे मदतीचे पॅकेज जाहीर केले आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील काही शेतकरी अद्यापही या मदतीपासून वंचित असल्याचे निदर्शनास आणून देत माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी या करिता अतिवृष्टीबाधित सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी मदतीची रक्कम मिळावी अशी मागणी केली आहे. त्याच बरोबर शासनाच्या वतीने रब्बीच्या पेरणीसाठीही मदत जाहीर केली आहे. सदर मदत रब्बी पेरणीच्या पंधरा दिवस अगोदर मिळावी, जेणेकरून शेतकऱ्यांना पेरणीसाठी खत व बियाणे खरेदी करणे शक्य होणार आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकता दर्शविली असून जिल्ह्यातील सर्वच शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळेल, असा विश्वास आ. निलंगेकर यांनी व्यक्त केला आहे.

## रेणापूर येथील शेख रिजवान देशात तिसरा आ रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

लातूर :- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील इलेक्ट्रिशियन या विषयात ९९.१६ टक्के गुण मिळवून रेणापूर येथील शेख रिजवान शहेनशाह या विद्यार्थ्याने देशात तिसऱ्या क्रमांकाचे घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रेणापूर येथील शेख शहेनशाह सुलेमान यांचा मुलगा शेख रिजवान याने चाकूर नजीक ग्रामीण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत इलेक्ट्रिशियन करिता प्रवेश घेतला होता. जिद्द आणि मेहनत करून शेख रिजवान याने ९९.१६ टक्के गुण मिळवून देशात तिसऱ्या क्रमांकाचे घवघवीत यश संपादन केले. या यशाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित



सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे, शेख रिजवान यांचे वडील शेख शहेनशाह, चुलते शेख खलील, मारूफ अत्तार, शेख सलीम, शेख मकसूद, रफिक शिकलकर यांच्यासह इतर अनेक जण होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## ग्रामीण पातळीवरची ‘डिजिटल क्रांती’

गावपातळीपासून ते संसद भवनापर्यंत सर्वच कामकाज ई–गव्हर्नसच्या अखत्यारीत आणण्यासाठी काम केले जात असताना ग्रामीण पातळीवरचे डिजिटल क्षेत्रातील यश कौतुकास्पद म्हणावे लागेल. फारशी सुविधा नसतानाही ग्रामीण जनतेच्या पाठिंब्यामुळे देशातील काही ग्रामपंचायतींनी ई–गव्हर्नसमध्ये यश मिळवले. डॉ. ऋतू सारस्वत, सामाजिक क्षेत्राच्या अभ्यासक आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे २८ व्या राष्ट्रीय संमेलनात ई–गव्हर्नस क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या ग्रामपंचायतीना गौरविण्यात आले. देशभरातील असंख्य ग्राम पंचायतींकडून अर्ज आले आणि त्यापैकी चार ग्राम पंचायतींची निवड करण्यात आली. यापैकी दोन ग्रामपंचायतींच्या सरपंचपदी महिला विराजमान आहेत. काही काळापूर्वी डिजिटल तंत्रज्ञान तळागळात न जाण्यास केवळ माहितीचा अभाव कारणीभूत नसून सामाजिक आर्थिक असमानता, लिंगानुभाव आणि डिजिटल साक्षरता या गोष्टीदेखील महत्त्वाच्या असल्याचे म्हटले जाते; पण आता काळ बदलत आहे. पंचायत राज व्यवस्थेत महिला नेतृत्वाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यात मर्यादित प्रमाणातील डिजिटल सुविधांचादेखील समावेश आहे; परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने डिजिटल क्रांतीचे आवाहन केल्याने चित्र बदलले. त्याची परिणिती पुरस्कारात झाली. विजयी ग्रामपंचायतींनी डिजिटल शासन, पारदर्शकता आणि सेवा वितरणाचे नवीन मापदंड निश्चित केले आहेत.

सुवर्णपदक विजेती महाराष्ट्रातील रोहिणी ग्रामपंचायत पूर्णपणे पेपरलेस आणि ई–कार्यालय प्रणालीचा स्वीकार करणारी पहिली ग्रामपंचायत ठरली. या ग्रामपंचायतीकडून १,०२७ प्रकारच्या ऑनलाईन सेवा प्रदान करण्यात येतात. तसेच गावात शंभर टक्के डिजिटल साक्षरता आहे. तक्रारीचे तत्काळ निवारण, बहुपयोगी एसएमएस सेवेच्या माध्यमातून शासन नागरिकांच्या सेवेसाठी सदैव हजर असल्याची भावना रुजविली आहे. त्याचवेळी त्रिपुरातील पश्चिम मजलीशपूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी महिला असून तेथे पब्लिक चार्टर आधारित पंचायत शासन व्यवस्था एक आदर्श मॉडेल म्हणून नावारूपास आले आहे. जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र, व्यापार परवाना, मालमत्ता नोंदणी, मनरेगा जॉब कार्ड या सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. प्रत्येक तक्रारीची दखल घेतली जाते आणि या डिजिटल मार्गाने त्याचा निपटारा करताना शासन कर्तव्य, वेळेचे महत्त्व आणि पारदर्शकतेची साक्ष मिळते.

समीक्षकांचा पुरस्कार गुजरातच्या पलसाना ग्रामपंचायतीने पटकावला. तेथे क्यूआर/यूपीआय आधारित मालमत्ता कर भरणी, ऑनलाईन तक्रार निवारण आणि पारदर्शक कल्याणकारी वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी ‘डिजिटल गुजरात’ आणि ‘ग्राम सुविधा’ यासारख्या पोर्टलचे अनावरण केले. दरवर्षी दहा हजारांपेक्षा अधिक नागरिकांना ऑनलाईन सेवेचा लाभ दिला जातो. समीक्षकांचा दुसरा पुरस्कार ओडिशातील सुआकाटी ग्रामपंचायतीने पटकावला असून तेथेदेखील सरपंच महिला आहे. ‘ओडिशा वन’ आणि ‘सेवा ओडिशा’ या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अत्यावश्यक सेवांचे डिजिटायजेशन केले आहे. त्यामुळे नागरिकांना २४ तास सेवा उपलब्ध राहते. महिला नेतृत्व आणि सर्वसमावेशक सेवा वितरण पाहता डिजिटल तंत्रज्ञान हे सरकार आणि नागरिकांतील अंतर कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सिद्ध होते.लीळ

राष्ट्रीय ई–गव्हर्नस योजना २००६ मध्ये सुरू झाली आणि या ‘एनईजीपी’नुसार ई–पंचायत प्रकल्प हा प्राधान्यक्रमाने राबविण्यात आला. पंचायत राज मंत्रालयाने आयटी उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी एक समिती नेमली आणि त्यात माहिती आणि आवश्यक सेवेच्या गरजांचे आकलन केले. २००९ मध्ये देशभरात व्यापक रूपाने त्याचा अभ्यास झाला. समितीच्या शिफारशीचा अहवाल तयार झाला आणि त्यात विकास प्रकल्पाची मांडणी करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या कामकाजाच्या सर्व बाजूंचा विचार करताना ‘कोअर कॉमन प्लिकेशन’चा एक संच तयार करण्यात आला. पंचायत राज संस्थांत ई–गव्हर्नस मजबूत करण्यासाठी आणि गुंतागुंत कमी करण्यासाठी एप्रिल २०२० मध्ये ‘ई–ग्रामस्वराज’ लाँच करण्यात आले. स्मार्ट फोनचा व्यापक उपयोग आणि ई–गव्हर्नस प्लिकेशनचा वापर वाढल्याने ग्रामस्वराज आणि ‘एम–क्शनसॉप्ट’साठी एक अँड्राईडआधारित प विकसित केले आहे.

ग्रामपंचायतीच्या कामकाजात सुलभता आणण्यासाठी आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने पंचायतीचे निर्णय ऑनलाईन उपलब्ध करून दिले, तसेच प्लिकेशन आणि पच्या मदतीने ग्रामसभांचे वेळापत्रक ऑनलाईनवर अपलोड केले. पंचायतीचे निर्णय पच्या माध्यमातून जनतेला कळू लागले, तसेच ग्रामसभा बैठकांसह पंचायतीच्या बैठकांची माहिती देखील घरबसल्या मिळू लागली. ग्रामसभेत नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी पमध्ये फिचर जोडण्यात आले. या माध्यमातून नियोजित ग्रामसभेची माहिती आणि अजेंडा ‘पंचायत निर्णय पोर्टल’ आणि पवर अपलोड केला जाऊ लागला आणि प वापरणारा नागरिक कोणतीही धावपळ न करता सभेत उत्स्फूर्तपणे सहभागी होईल, या दृष्टीने नियोजन करण्यात आले. अनेक राज्यांत पंचायत आता इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जन्म, मृत्यू, उत्पन्न, रहिवासी प्रमाणपत्र जारी किंवा तयार करतात. व्यापारासाठी लागणाऱ्या परवानग्या तसेच मालमत्ता कर भरणा आदींसाठी डिजिटल सेवा प्रदान केली जात आहे. महाराष्ट्र, झारखंड आणि छत्तीसगड येथे इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून ऑनलाईन सेवा प्रदान करण्यासाठी विकसित ‘सर्व्हिसप्लस’चा वापर होत आहे. दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी पंचायत राज मंत्रालयाने सुरू केलेला ‘सभासार’ हा मंत्रालयाच्या डिजिटल प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा आहे. आधुनिक एआय आणि नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंगवर आधारित असणारे हे स्मार्ट टूल ग्रामसभा आणि पंचायत बैठकांची ऑडिओ किंवा व्हिडीओ रिकॉर्डिंग करत बैठकीचा अजेंडा आणि निष्कर्ष अपलोड करू शकतो.

# एका लढाऊ अध्यायाची सांगता

मिग–२१ लढाऊ विमानांना भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातून अखेरीस निवृत्त करण्यात आले आहे. गेली साठहून अधिक वर्षे मिग–२१ व त्याच्या सुधारित आवृत्तींच्या लढाऊ विमानांनी भारतीय हवाई दलात सेवा बजावली आहे. गेल्या काही काळात मिग–२१ ही विमाने कोसळून वैमानिक किंवा नागरिकांच्या झालेल्या मृत्यूंमुळे ती विमाने बदनाम झाली होती. ‘फ्लायिंग कॅफिन’ म्हणजे उडत्या शवपेटिका असा त्या विमानांचा लौकिक झाला होता. तरीही या विमानांच्या स्क्वाड्रनला निरोप देण्याचा निर्णय लांबणीवर टाकण्यात येत होता. सक्षम पर्याय उपलब्ध नसणे हे त्याचे प्रमुख कारण. स्वदेशी बनावटीच्या तेजस हलक्या लढाऊ विमानांचा (लाइट कॉम्बॅट एअरक्राफ्ट) समावेश भारतीय हवाई दलात झाला आहे आणि आगामी काळात त्यांची संख्या वाढणार आहे. मात्र हेही खरे की मुळात तेजस लढाऊ विमानांच्या उत्पादनास विलंब झाला आहे. हवाई दल प्रमुखांनी त्यावर आपली नाराजीही व्यक्त केली आहे. पण हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडने (एचएएल) उत्पादनास गती देण्याची ग्वाही दिल्याने मिग–२१ लढाऊ विमानांना अखेर निरोप देण्याचे निश्चित झाले.



मिग जातीच्या लढाऊ विमानांची रचना सोव्हियत रशियाने १९६०च्या दशकात केली. भारताच्या दृष्टीने यातील महत्त्वाचा भाग हा होता की सोव्हियत रशियाने त्या विमानांचे उत्पादन भारतात करण्याचा परवाना दिला. परिणामतः आयातीवर असणारे अवलंबित्व कमी झाले आणि विमानांचा उत्पादन खर्च आटोक्यात ठेवता आला. ही विमाने भारतीय हवाई दलात १९६३ मध्ये सामील झाली आणि त्यानंतर जवळपास प्रत्येक युद्धात वा संघर्षात त्या विमानांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९६५च्या भारत–पाकिस्तान युद्धात जरी या विमानांचा वापर मर्यादित होता तरी १९७१च्या युद्धात मात्र पाकिस्तानी हवाई दलातील सेबर, मिराज इत्यादी जातीच्या विमानांना भारताच्या मिग–२१ विमानांनी निष्प्रभ केले.

१९९९ मधील कारगिल युद्धात मिग–२१ विमानांचा वापर करण्यात आला आणि अगदी अलीकडे २०१९ मध्ये भारतीय हवाई दलाने केलेल्या बालाकोट सर्जिकल स्ट्राइकसाठीही मिग–२१ बायसन जातीच्या विमानांचा वापर करण्यात आला. विंग कमांडर अभिनंदन वर्धमान चालवत असलेले मिग–२१ विमान पाकिस्तानने पाडले; वर्धमान त्यातून बचावले; पण पाकिस्तानी भूमीत त्यांचा शिरकाव झाल्याने पाकिस्तानने त्यांना ताब्यात घेतले. कालांतराने त्यांची सुटका करण्यात आली.

या सगळ्याचा मतितार्थ हा की मिग–२१ विमानांचे योगदान प्रदीर्घ काळ हवाई दलात राहिले आहे. सोव्हियत रशियाचे विघटन झाले आणि मिग–२१ विमानांचे उत्पादन थांबले. त्यानंतर सुट्या भागांचीही चणचण निर्माण झाली. विमान म्हणजे शेवटी यंत्रच. तेव्हा कितीही देखभाल केली तरी ते कधीतरी निवृत्तीच्या उंबरठ्यावर पोचतेच. त्यातच या विमानांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला. गेल्या साठेक वर्षांत भारतात मिग–२१ जातीच्या उत्पादन झालेल्या विमानांची संख्या सुमारे नऊशे इतकी आहे. पैकी ४८२ विमाने कोसळली आणि त्यांत १७० वैमानिकांना प्राणास मुकावे लागले अशी माहिती तत्कालीन संरक्षण मंत्री ए के अँटनी यांनी २०१२ मध्ये संसदेत दिली होती.

अगदी अलीकडे म्हणजे २०२३ मध्ये प्रशिक्षणादरम्यान मिग–२१ जातीचे एक विमान सुरतगड येथे नागरी वसाहतीवर कोसळले. त्यात वैमानिक जरी बचावले तरी तीन नागरिकांचा मृत्यू झाला. २००६ मध्ये आलेल्या ‘रंग दे बसंती’ चित्रपटाने मिग–२१ जातीच्या विमानांचा विषयच हाताळला होता. मुद्दा हा की मिग–२१ विमानांचे सामर्थ्य जरी वादातीत असले तरी त्यांच्या अपघातांनी ते बदनाम होत होते. १९९०च्या दशकातच ती विमाने निवृत्त होणे अपेक्षित असले तरी २०२५मध्ये मिग–२१ विमाने निवृत्त झाली.

हा विलंब झाला तो प्रामुख्याने तेजस लढाऊ विमानाच्या उत्पादनात होणार्या विलंबाने. स्वदेशी बनावटीच्या लढाऊ विमानांची संकल्पना १९८० च्या दशकातच मांडण्यात आली होती. सुखोई व राफेल विमानांमुळे हवाई दलाचे सामर्थ्य वाढलेले असले तरी हवाई दल पूर्ण ताकदीने उभे राहायचे तर सर्व स्क्वाड्रन (विमानांच्या तुकड्या) कार्यरत हव्यात. तेजस विमानाने पहिले उड्डाण २००१ मध्ये घेतले तरी हवाई दलात ती विमाने २०१६ मध्ये सामील झाली. त्यासाठी ‘४५ स्क्वाड्रन’ तुकडी तयार करण्यात आली. तेजस हे मिग–२१च्या तुलनेत सरस आहे. त्याचे वजन कमी; त्यामुळे लवचिकता जास्त आहे.

शिवाय जीईच्या इंजिनमुळे त्याची विश्वसनीयता वधारलेली आहे. तथापि तेजस विमानांच्या उत्पादनातील विलंब अनेक कारणांनी होता–त्यासाठीच्या इंजिनच्या अनुपलब्धतेमुळे असो वा त्या विमानांत एकीकृत क्षेपणास्त्र यंत्रणा अंतर्भूत करण्यातील अडचणींमुळे; अद्याप हवाई दलाला ३६ तेजस विमानेच मिळाली आहेत आणि आणखी चार विमाने पुढील वर्षीच्या प्रारंभी हस्तांतरित करण्याची हमी एचएएलने दिली आहे. ८३ तेजस विमानांच्या खरेदीसाठी ४८ हजार कोटींचे करारपत्र सरकारने २०२१ मध्ये एचएएलला दिले. पुढील आठ वर्षांत या विमानांचे हस्तांतरण होईल. परंतु आजवरचा विलंब पाहता हे वेळेवर होईलच याची खात्री देता येणे कठीण.

या पार्श्वभूमीवर प्रश्न येतो तो मिग २१च्या निवृत्तीनंतर काय हा. याचे कारण हवाई दलातील स्क्वाड्रनची संख्या २९ पर्यंत खाली येईल. पूर्ण क्षमता ४२ स्क्वाड्रनची आहे. ही तफावत मोठी आहे. मिग–२१च्या निवृत्तीनंतर निर्माण होणारी पोकळी भरून काढणे हे मोठे आव्हान असणार आहे. तेव्हा तेजस विमानांच्या उत्पादनाला वेग देणे निकडीचे. तूर्तास मिग–२१ लढाऊ विमानांनी भारतीय हवाई दलातून अपरिहार्य निवृत्ती स्वीकारली आणि एका लढाऊ अध्यायाची सांगता झाली.

# महागात पडणारी कारवाई

लडाखमधील सामाजिक आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना करण्यात आलेली अटक हा सध्याचा हॉट टॉपिक ठरला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरून त्यांच्या अटकेचा निषेध केला जात आहे. भारतातल्याही अनेक ज्येष्ठ विचारवंतांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वांगचुक यांच्या अटकेवर तीव्र नाराजी व्यक्त करीत सरकारला ही अटक महागात पडेल, असा इशारा दिला आहे. अगदी मोदी सरकारचे समर्थक समजले जाणारे काही विचारवंतसुद्धा या अटकेच्या विरोधात आपले मतप्रदर्शन करताना दिसत आहेत.

वांगचुक यांच्यावर देशद्रोहाची कलमे लावली गेली आहेत, हा सगळ्यात आक्षेपाचा भाग आहे. जो माणूस लडाखमधील चिनी आक्रमणाच्या विरोधात आवाज उठवतो आहे त्याच माणसाला देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करणे हे केवळ सुडापोटीच झालेले काम आहे यावर बहुतांश लोकांचे एकमत होताना दिसते आहे. सोनम वांगचुक यांनी ज्या मागण्यांसाठी उपोषण आंदोलन सुरू केले होते, त्या मागण्या काही अवास्तव किंवा जगावेगळ्या नाहीत. उलटपक्षी भारतीय जनता पक्षानेच ज्या मागण्यांचे लडाखवासीयांना निवडणुकांपूर्वी जाहीर आश्वासन दिले होते त्या आश्वासनाची केंद्र सरकारला आठवण करून देण्याचे काम सोनम वांगचुक करीत आहेत.



त्यासाठीच ते उपोषणाला बसले होते. लडाखवासियाना स्वतंत्र राज्य हवे आहे, तसेच या राज्याचा किंवा या प्रदेशाचा समावेश घटनेच्या सहाव्या शेड्युलमध्ये करावा अशी त्यांची मागणी आहे. या दोन्ही मागण्या भारतीय जनता पक्षाने यापूर्वीच मान्य केलेल्या आहेत. त्या मागण्यांची पूर्तता कधी होणार असा लडाखमधील आंदोलकांचा साधा सवाल आहे. पण निवडणुकीपूर्वी आश्वासने द्यायची आणि निवडणुका झाल्या की तेथून काढता पाय घ्यायचा अशा राजकीय प्रवृत्तीनुसार लडाख वासियांच्या मागण्यांनाही वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या, त्यातून लडाखमधील नागरिकांचा असंतोष दिवसेंदिवस वाढत गेला. त्याचीच परिणिती हिंसाचारात झाली.

तरुण पिढी यात मोठ्या संख्येने सहभागी झाली. नेपाळमधील आंदोलनाची आठवण यावी अशा स्वरूपाचे हे आंदोलन होते. वांगचुक यांच्या उपोषणाला पंधरा दिवस झाल्यानंतर लोकांचा संयम सुटला आणि त्यांनी तेथे कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या आंदोलनाला संयमित स्वरूपात हाताळण्यापेक्षा त्यांच्यावर थेट बंदुका चालवल्या गेल्या आणि या आंदोलनाला कारणीभूत ठरल्याबद्दल सोनम वांगचुक यांना देशद्रोही ठरवून कारागृहात डांबण्यात आले. त्यांना लडाखहून राजस्थानच्या तुरुंगात नेण्यात आले आहे. त्यांच्यावर पाकिस्तानशी संबंध असल्याचाही आरोप ठेवला गेला आहे.

त्यांच्या स्वयंसेवी संस्थेला विदेशातून देणग्या मिळतात आणि त्यातून ते देशात अस्थिरता माजवतात हा नेहमीचा आरोपही त्यांच्यावर केला गेला. त्यांना विदेशातून देणग्या घ्यायला बंदी केली गेली आणि हे आंदोलन सरसकट शस्त्राच्या बळावर चिरडले गेले. प्रसार माध्यमांमध्ये त्याविषयीच्या बातम्या सविस्तर स्वरूपात येऊ नयेत याचीही दक्षता घेतली गेली. थोडक्यात, लडाखवासियांची चारही बाजूंनी गळचेपी केली गेली. आता ही गळचेपी तेथील जनता सहजासहजी सहन करील असे मानता येणार नाही. कारण या आंदोलनाचे नेतृत्व करणारे सोनम वांगचुक हे एक जागतिक मान्यता पावलेले पर्यावरणवादी व सुधारणावादी कार्यकर्ते आहेत. देशातल्या सर्वसामान्य जनतेला आमिर खान यांच्या ‘थ्री इडियट’ या सिनेमाद्वारे सोनम वांगचुक या व्यक्तिमत्त्वाची तोंडओळख झालेली आहेच.

त्यांच्यावर बाकी कुठलाही आरोप केला जाऊ शकतो, पण त्यांना देशद्रोही कधीच ठरवले जाऊ शकत नाही. पण मोदी सरकारने त्यांना देशद्रोही ठरवले आहे त्यातून जनमत अधिकच खवळलेले दिसते. मुळात ज्या मागण्या भारतीय जनता पक्षाने याआधीच मान्य केल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात सरकारला आज काय अडचण आहे याचा उलगडा झालेला नाही. लडाखमध्ये अलीकडेच नव्याने काही खनिजांच्या खाणी सापडल्या आहेत, त्या खाणी आपल्या उद्योजक मित्रांना देण्यासाठी केंद्र सरकार लडाखवरील नियंत्रण सोडायला तयार नाही, असा युक्तिवाद काही जण करताना दिसतात.

या आरोपात तथ्य किती हा वेगळ्या चर्चेचा मुद्दा असला तरी सरकारने लडाखवासियांचे आंदोलन अत्यंत क्रूरपणे चिरडले आहे हे मात्र ठळक दिसून आले आहे. कुठल्याच प्रांतातील स्थिती संयमाने किंवा समजुतीने हाताळायचीच नाही असा जणू सरकारने विडाच उचलला आहे काय असे वाटावे अशी ही स्थिती आहे. याच सोनम वांगचुक यांचे वडील सोनम वांगयाल हेही लडाखमधील सुधारणावादी आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते होते. त्यांना तेथील समाजात मोठा मान होता. त्यांची एक आठवण यानिमित्ताने झाल्याशिवाय राहत नाही. १९८४ साली त्यांनी लडाखमधील नागरिकांना अनुसूचित जमातींचा दर्जा द्यावा या मागणीसाठी उपोषण आंदोलन सुरू केले होते, त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी स्वतः लडाखमध्ये गेल्या होत्या आणि त्यांनी सोनम वांगयाल यांच्याशी चर्चा करून या आंदोलनावर सामोपचाराने तोडगा काढला होता.

इतिहासातल्या अशा सगळ्या दाखल्यांची दखल घेऊन केंद्र सरकारने मार्गक्रमण केले पाहिजे. अन्यथा मणिपूर, काश्मीर या प्रांतांच्या पाठोपाठचा लडाख जर अशांत आणि अस्थिर होत गेले तर देशापुढे ती एक मोठी समस्या ठरू शकते. सरकार चालवणे म्हणजे केवळ सत्ता टिकवणे नव्हे.

देशाच्या भवितव्याचा विचार करून कुठल्याही प्रांतातील जनसमुहांना अस्थिर ठेवणे किंवा त्यांच्यामध्ये सतत असंतोष धुमसता ठेवणे हे देशहिताच्या दृष्टीने धोकादायकच आहे. भविष्यात त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात याचा अंदाज केंद्रातील सरकारला एव्हाना यायला हवा. त्यामुळे सोनम वांगचुक यांच्यावर दडपशाही करण्यापेक्षा त्यांना बरोबर घेऊन लडाखमध्ये कायमस्वरूपी शांतता कशी प्रस्थापित करता येईल आणि हा प्रदेश कायमस्वरूपी भारताशीच कसा जोडलेला राहील यासाठी केंद्राने प्रयत्न करायला हवेत. पण हे मोदी, शहा यांना प्रभावी शब्दात समजावून कोण सांगणार हा मुख्य प्रश्न आहे.

# पंचशील सामाजिक संस्थेतर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन जल्लोषात साजरा

नवी मुंबई / के. एच. हनवते :- पंचशील सामाजिक संस्था व पंचशील महिला मंडळ नेरूळ नवी मुंबई यांच्यातर्फे अशोका विजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आगरी कोळी भवन येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात विविध पक्ष नेते तसेच सामाजिक संघटना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लोकशाहीर विठ्ठल उमप यांचे सुपुत्र : संदेश विठ्ठल उमप यांचा भीम गीतांच्या कार्यक्रमात उपस्थित बोध उपासक, उपासिका यांनी मनसोक्त आनंद व्यक्त केला.

संजीवनी क्लासेस चे संचालक सुभाष कदम सर पुरस्कृत १० वी १२ वी विद्यार्थ्यांचा व संस्थेद्वारे सेवा निवृत्त सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमात नवी मुंबई महानगर पालिका पुरस्कृत समूह नाटक सादरीकरणात प्रथम पारितोषिक विजेत्या पंचशील महिला मंडळ, महिला अध्यक्षा शालिनीताई औचर यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मचक्र प्रवर्तन दिन २०२५ निमित्त



विविध कार्यक्रमाचे आयोज करण्यात आले होते सर्वप्रथम आदर्श त्रिशरण पंचशील, बुद्ध वंदना, भीमस्मरण भीम स्तुती, त्रिरत्न वंदना, मैत्री गीत, तथागत गौतम बुद्ध यांचा पाळणा सदर कार्यक्रमात



उद्देशिका वाचन व तथागत भगवान बुद्धांवर आधारित नृत्य, बुद्ध आणि धम्म या ग्रंथावर आधारित धनंजय कीर यांच्या ग्रंथातून घेतलेले काही प्रसंग प्रस्ताविकेसह सादर करण्यात आले, सदर कार्यक्रमात १-सुजाताची खिरदान २-धनंजनी ३-आम्रपाली ४-विशाखा ५-किसा गौतमी ६-महा प्रजापती गौतमी व यशोधरा याची धम्मदिक्षा, ७-महिला कशा उपासक बनल्या आणि त्या काळात हि तथागत भगवान बुध्द यांनी महिलांना समान हक्क कसे दिले आहेत इत्यादी विषयांवर शिस्तबद्ध आणि सुंदर नाटक सादर करण्यात आले सदर कार्यक्रम ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं. ४ ते रात्री १० वाजेपर्यंत स्थळ: आगरी कोळी भवन (ऑडिटोरियम थिएटर) नेरूळ नवी मुंबई येथे, पंचशील सामाजिक संस्था (रजि.) योगेश कदम (अध्यक्ष), प्रल्हाद गायकवाड (कार्याध्यक्ष), विशाल खूपटे (महासचिव), सचिन एळीजे (खजिनदार), व पंचशील महिला मंडळ, शालिनीताई औचर (महीला अध्यक्षा)

इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गेल्या दोन महिन्यांपासून परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल मंडळाच्या दोन्ही अध्यक्षांनी सर्वांचे मनःपूर्वक जाहीर आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

# जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश

## या यशाबद्दल संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे केले कौतुक

केज/प्रतिनिधी जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे या यशाबद्दल संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक करून खेळाडूंना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील नामांकित जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले होते सदर खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली होती.

दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. या स्पर्धेत १४ वर्षीय वयोगटातुन मुलांमध्ये चि. अर्थ शिवराज घुले गोळा फेक प्रथम, २०० मीटर धावणे तृतीय, चि.रोनक रणधीर ठोके २०० मीटर धावणे द्वितीय, लांब उडी मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला, चि.विष्णू सुधाकर केदार १०० मीटर धावणे तृतीय क्रमांक पटकाविला. तर १४ वर्षीय वयोगटातून मुलींमध्ये कु.धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थी खेळाडू यांच्या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक म्हणून साजिद पठाण सर, भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवी मॅडम व किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.



या स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थ्यांना विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे, प्राचार्य दत्तात्रय हंडीबाग, बंसल क्लासेस चे सहसंचालक गोविंद ठोंबरे, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विजेते खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. व शिक्षकांचे कौतुक करून खेळाडूंना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरातील नामांकित जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले होते सदर खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली होती.

दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या आहेत. या स्पर्धेत १४ वर्षीय वयोगटातुन मुलांमध्ये चि. अर्थ शिवराज घुले गोळा फेक प्रथम, २०० मीटर धावणे तृतीय, चि.रोनक रणधीर ठोके २०० मीटर धावणे द्वितीय, लांब उडी मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला, चि.विष्णू सुधाकर केदार १०० मीटर धावणे तृतीय क्रमांक पटकाविला. तर १४ वर्षीय वयोगटातून मुलींमध्ये कु.धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक द्वितीय क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थी खेळाडू यांच्या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक म्हणून साजिद पठाण सर, भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवी मॅडम व किशोर मस्के सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या स्पर्धेतील विजेते खेळाडू विद्यार्थ्यांना विभागीय स्तरीय स्पर्धे साठी संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे, प्राचार्य दत्तात्रय हंडीबाग, बंसल क्लासेस चे सहसंचालक गोविंद ठोंबरे, मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विजेते खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विरोधी पक्षांच्या बैठका फसल्या - मुख्यमंत्री फडणवीस

निवडणुकीतील पराभव स्वीकारून लोकांकडे परत जाण्याऐवजी विरोधी पक्ष लोकशाही संस्था आणि संविधानावर टीका करत असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांच्या निवडणूक आयोगाच्या भेटीच्या मुद्द्यावर टीका केली. मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) कार्यालयाने दिलेल्या मतदार याद्यांच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाद्वारे घेतल्या जातात, असे फडणवीस यांनी निदर्शनास आणून दिले.

जर पुरावे सादर केले तर यादीत भर घालण्यात येते आणि वगळण्यात येते, असे त्यांनी सोलापूर येथील पत्रकारांना सांगितले. फडणवीस म्हणाले की, गेल्या दोन दिवसांतील बैठका म्हणजे एक कथा तयार करण्याचा प्रयत्न होता. या बैठका फसल्या कारण विरोधी पक्षाच्या नेत्यांना कोणते प्रश्न विचारायचे आणि कोणाला विचारायचे हे माहित नव्हते. सत्ताधारी पक्षांनाही निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष पद्धतीने घ्यायच्या आहेत आणि ते योग्य मतदार यादीच्या मागणीला पाठिंबा देतात असे ते म्हणाले. डुप्लिकेट नावे ही अलिकडची घटना आहे का? आम्ही तक्रार करत आहोत. जेव्हा तुम्ही सत्तेत होता तेव्हा (मतदारांची) डुप्लिकेट नावे अस्तित्वात होती, असे विरोधी पक्षाच्या दाव्यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या स्थलांतरित मतदारांनी राज्यात आणि त्यांच्या मूळ ठिकाणी मतदार म्हणून नोंदणी केली आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. विरोधी पक्षांच्या एकतेवर टीका करताना फडणवीस म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) प्रमुख शरद पवार बुधवारी बैठकीला उपस्थित राहिले नाहीत कारण त्यांना माहित होते की ते (महाविकास आघाडीचे नेते) संस्था आणि संविधानावर आरोप करत आहेत.

# चला घेवू एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा-डॉ.वसुदेव गायकवाड

केज/प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीअर्थात वाचन - प्रेरणा दिन घेवू चला एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा हे घोषवाक्य प्रमाणभूत मानून ग्रंथप्रदर्शन, ग्रंथवाचन, विश्व कोषाबाबत माहिती व कार्यशाळा, व्याख्यान, सामुहिक वाचन, चर्चा चर्चासत्र, कार्यगौरव, साहित्यीकांची मुलाखत, ग्रंथभेट आदी सांस्कृतीक कार्यक्रम साजरे करून वाचन - प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. सकाळी ८-०० ते रात्री ८-०० पर्यंत विविध कार्यक्रम व उपक्रम साजरे करण्यात आले. . चला घेवया एकच वसा, मराठीला बनवू ज्ञानभाषा याचे नियमित पालन करन मराठी ज्ञानभाषा बनवण्यासाठी प्रत्येक मराठी साहित्य वाचावे व जपावे असे अवाहन ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाज समाजसेवक सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्यात डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी व्याख्यान प्रसंगी अवाहन केले.




सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड हे होते. सर्वप्रथम डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेल मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले व सर्व कार्यक्रमाचे उद्घाटनही करण्यात आले. विश्वकाषाबाबत माहिती व कार्यशाळेत दादासाहेब गायकवाड,ज्ञानोबा भोगजकर, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.ग्रंथभेट २० वाचकांना देण्यात आले.

सामुहिक वाचन करण्यात आले. तसेच वयक्तीक ग्रंथवाचनही करण्यात आले. साहित्यीक, कवी प्रा. माणिकराव आनंदगांवकर यांची मुलाखत सेवानिवृत्त शिक्षक रामकृष्ण( तात्या) गायकवाड यांनी घेतली. तसेच जेष्ठ साहित्यीकांचा सत्कार रविंद्र गायकवाड( पेंटर) यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार, ग्रंथभेट देऊन करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शनात माजी सरपंच रामराजे गायकवाड, रावसाहेब जाधव, आरुण गायकवाड, संजय सोनवणे, आनंद गायकवाड, बबन पुंड, कृष्णराजे गायकवाड, शिवदास गायकवाड, आर.ए. गायकवाड, कमलाकर साबळे, नारायण गायकवाड, यांच्यासह शेकडो टप्याटप्याने वाचकांनी सहभाग घेतला. सकाळी ८-०० ते रात्री ८-०० या वेळात सर्व कार्यक्रम संपन्न झाले. अध्यक्षीय समारोप माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड यांनी केला. सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

## बनावट क्लोजअप अन् इनो ; दिल्लीत दोन कारखान्यांवर छापा, 'विष' तयार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

दिल्लीतील एका बातमीवरून लोकांचे आरोग्य किती धोक्यात आले आहे याचा अंदाज येतो. छापेमारीदरम्यान दोन कारखाने उघडकीस आले, ज्याठिकाणी बनावट टूथपेस्ट, इनो आणि इतर दैनंदिन वस्तू तयार केल्या जात होत्या. छापा टाकणाऱ्या पथकाने आता दोन्ही कारखाने सील केले आहेत.



समोर आलेल्या माहितीनुसार, वझिराबादमध्ये असणारे हे कारखाने थोड्या अंतरावर आहेत. एका कंपनीने बनावट टूथपेस्ट बनवली, तर दुसऱ्या कंपनीने इनो बनवले. उत्पादनानंतर, उत्पादने दिल्ली आणि इतर राज्यांमधील बाजारपेठांमध्ये पुरवली जात होती.

एनो पिल्याने पोटात आग वझिराबाद पोलिसांनी याविषयी दिलेल्या माहितीनुसार, याठिकाणी दोन कारखाने बनावट टूथपेस्ट आणि इनोसह इतर दैनंदिन वस्तू तयार करत होते. छापेमारीदरम्यान, मोठ्या प्रमाणात बनावट टूथपेस्ट आणि इनो जप्त करण्यात आले. जगतपूरमधील एका निवासी घरात मोठ्या प्रमाणात बनावट वस्तू देखील जप्त करण्यात आल्या.

याठिकाणी तयार होणाऱ्या टूथपेस्ट वापरल्यास दात किडण्यास कारणीभूत ठरू शकतो. बनावट इनो इतका शक्तिशाली होता की तो पिल्यानंतर अनेकांच्या पोटात जळजळ आणि आग होऊ शकते. दोन्ही कारखाने सील करण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# केजमध्ये कोरडेवाडी येथील ग्रामस्थांचा ५ तास रास्ता रोको ; दोघांचा आत्मदहनाचा प्रयत्न ५बसवर दगडफेक;५ प्रवाशी जखमी

**जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा ; आंदोलक तहसीलमध्ये ठाण मांडून उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी आंदोलकांना रास्ता रोको मागे घ्यायला लावून तहसील कार्यालयातून जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणे करून दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी राज्यांच्या सचिवांशी चर्चा घडवून देण्याचे आश्वासन दिले. मात्र आताच तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र द्यावे, असा आग्रह धरीत तहसील कार्यालयात आंदोलक ठाण मांडून होते.**

केज/प्रतिनिधी कोरडेवाडी येथील साठवण तलावासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत व संपूर्ण कर्जमाफी करावी, ज्ञानराधा बँकेच्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत देण्यात यावी यासह विविध मागण्यांसाठी आक्रमक झालेल्या ग्रामस्थांनी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२५ दुपारी ११-३० वाजता मोर्चा काढून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तब्बल ५ तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनात बाळराजे आवरे पाटील यांनी स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून तर स्वप्नील वरपे यांनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. तर अज्ञातांनी बसवर दगडफेक केल्याने पाच बसचे काचा फुटून नुकसान झाले. तसेच बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले.छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठानच्या राजश्री उमरे यांनी मागील बारा ते तेरा दिवसांपासून या मागण्यासाठी उपोषण सुरू केले असताना शासनाकडून मागण्यासंदर्भात दखल घेतली नसल्यावरून ८ ऑक्टोबर रोजी संतप्त आंदोलकांनी शासकीय विश्रामगृह येथून बैलगाडी मोर्चा काढून तहसील कार्यालयासमोर पेट्रोल टाकून बैलगाडी पेटविली. काही आंदोलनकांनी अंगावर



पेट्रोल ओतून आत्मदहणाचा प्रयत्न केला होता. त्यानंतर ११ ऑक्टोबर रोजी आंदोलक व गावकऱ्यांनी टोकवाडी रस्त्यावरील तलावात उतरून जलसमाधी आंदोलन केले. या दोन आंदोलनानंतर ही शासनाकडून मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने गावकरी आक्रमक बनले होते.मंगळवारी सकाळी १०.३० वाजता आक्रमक झालेल्या गावकऱ्यांनी मुलाबाळांसह केजला मोर्चा काढला. दुपारी ११.३० वाजता धारूर चौकातून मोर्चाला सुरुवात करीत पाणी आमच्या हक्काचे, देत कसं नाही, घेतल्याशिवाय राहत नाही, शेतकऱ्यांना ५० हजार रुपये अनुदान व कर्जमाफी मिळाली पाहिजे अशा घोषणा देत अहिल्यानगर -अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दुपारी पावणे एक वाजता रास्ता रोको आंदोलनास सुरुवात केली. आंदोलनकर्त्यांनी आपल्या भाषणातून खासदार, आमदारांसह सरकारवर टीकेची झोड उठवून तब्बल साडेचार तास रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात बाळराजे आवरेंनी पेट्रोल अंगावर ओतून तर स्वप्नील वरपेंनी विषारी औषध प्राशन करीत आत्मदहनाचा प्रयत्न केला.आंदोलन सुरू असताना अज्ञातांनी रस्त्यावर उभ्या असलेल्या लातूर - पाटोदा (एम. एच. १४ एमएच १५५९), अहमदपूर - चाळीसगाव (एम. एच. १४ एमएच ६५२२), उदगीर - गंगापूर (एम. एच. १४ एमएच ८९३८), गंगाखेड - आळंदी (एम. एच. १४ बीटी ३९६४), (एम. एच. २० बीएल २१०८) या बसच्या समोरील काचावर दगडफेक करण्यात आल्याने बसचे नुकसान झाले आहे. तर बसमधील चालक, वाहकांसह पाच प्रवाशी जखमी झाले.त्यामुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही बस या बसस्थानकात उभ्या केल्याने बसस्थानक बसने गच्च भरले होते. दरम्यान, शहरात आलेली वाहने रास्ता रोकोमुळे रस्त्यावर थांबून राहिल्याने दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तर अंबाजोगाई, बीड, पुणे, कळंब, धारूर रस्त्यावरील वाहतूक चार तास ठप्प राहिल्याने प्रवाशी नागरिक - महिला अडकून पडले होते. तर प्रवाशांची उपासमार झाली.

## कोकणात 'कमळ' फुलवण्यासाठी भाजपची प्रयत्नांची परिकाष्ठा; पडद्यामागून सूत्र हलवणारे अनिकेत पटवर्धन कोण?

राज्यात महाविकास आघाडी (विरोधक) आणि महायुती (सत्ताधारी) आहेत. आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर असताना भाजपने मोठा डावा टाकला अन् एकनाथ शिंदेंना बंड करण्यासाठी बळ पुरवले. परिणामी आघाडीच्या सरकारला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. त्यानंतर भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर इन्कमिंग वाढत गेले. भाजपने राज्यातील शिवसेनेचे प्रभत्व असलेल्या कोकणात राजकीय खेळी करत कमळ फुलवायला सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक बडे नेते भाजपवासी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. पण ज्यावेळी मविआची सत्ता राज्यात होती, त्यावेळी भाजपने विशेष लक्ष कोकणावर केंद्रीत केले. कोकणात अनेक मोठे नेते गळ्याला लावण्यासाठी भाजपकडून रणनिती आखण्यात आली होती. आता कोकणात कमळ फुलविण्यासाठी पडद्यामागे अनेक हालचाली होत आहेत आणि आगामी काळात होणार आहेत. त्यामुळे पडद्यामागून सूत्र हलविणाऱ्या शिलेदाराचा चेहरा समोर आला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे निकिटवर्तीय अनिकेत पटवर्धन असे त्यांचे नाव आहे. पटवर्धन यांनी कोकणात भाजप वाढवण्यात मोठी कामगिरी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर कोकणात भाजपमध्ये आणखी इनकमिंग सुरूच राहणार आहे. धैर्यशील पाटीलपासून वैभव खेडेकरांपर्यंत मोठ्या नेत्यांना भाजपात आण्यासाठी महत्वाची कामगिरी अनिकेत पटवर्धन यांनी बजावली आहे. येत्या काही दिवसांमध्ये अनेक दिग्गज नेते भाजपच्या वाटेवर आहेत. त्यांना गळाला लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. कोण आहेत अनिकेत पटवर्धन? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे विश्वासू मानले जातात.

